क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/ ९९९२
दिनांक : 02 AUG 2016

प्रति,
संचालक,
कॉलेज ऑफ इंजिनियरींग,
पुणे

विषय : एम.टेक.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी NON GATE उमेदवारांमधून प्रवेश करण्याच्या जाहिरातीबाबत....

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरण्याबाबत वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शासनाने निर्धारीत केलेल्या शैक्षणिक अर्हतेव्यतिरिक्त म्हणजेच NON GATE उमेदवारांनाही प्रवेश घेता येऊ शकेल असेही सदर जाहिरातीत नमूद केलेले आहे. तसेच अशा उमेदवारांसाठी संस्थास्तरावर प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात येणार असल्याचे नमूद करून ती परीक्षा देणे आवश्यक असल्याचे नमूद आहे.

यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, शासनाने महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक१७.८.२०१५लागू केला व यामधील तरतूदीनुसार सामायिक प्रवेश परीक्षेमार्फत प्रवेश करण्याची तरतूद केली आहे.तसेच प्रवेशाचे प्राधिकारी म्हणून मा.आयुक्त,प्रवेश नियामक प्राधिकरण हे असून शासनाने निर्धारीत केलेल्या प्रवेश नियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पध्दतीने प्रवेश करता येत नाही हे आपणास विदीत आहे. तरीही आपल्या संस्थेमार्फत अशा प्रकारची जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन नियमबाहय पध्दतीने प्रवेश करण्याचे प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, शासनाने दिनांक ११.३.२०१६ रोजी जाहीर केलेल्या प्रवेश नियमाव्यतिरिक्त अन्य प्रवेश नियमानुसार प्रवेश करण्यात येऊ नयेत. तसे केल्यास सदर प्रवेश अनधिकृत प्रवेश म्हणून समजण्यात येतील, पर्यायाने विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस आणि पुढील कारवाईस सर्वस्वी आपण जबाबदार असाल याची नोंद घ्यावी.

(दयानंद मेश्राम)
सह संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीसाठी सविनय सादर
१.मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१६/ 2862
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 22 AUG 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-
१) प्राचार्य, एम.टेक / एम.ई. अभ्यासक्रमाच्या संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात नमुद सूचनाचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता